# हिराबाई बडोदेकर



जन्म - २९ मे १९०५

मृत्यू - २० नोव्हेंबर १९८९

हिराबाई बडोदेकर ह्या प्रसिद्ध गवई अब्दुल करीम खान व बडोद्याच्या राजघराण्यातल्या ताराबाई यांच्या कन्या होत्या. त्यांना त्यांच्या वडिलांकडून गाण्याची तालीम मिळाली नाही पण किराणा घराण्याचे गवई उस्ताद वहीद खान यांच्याकडून चांगलीच लाभली. त्यांचा वरील "षड्ज" म्हणजे "सां" हा अतुलनीय होता. तो अद्यापपर्यंत इतर कुठल्याही स्त्री गायकात सापडत नाही. ही अतिशयोक्ती नाही. मंचावर तिकीट लावून स्त्री गाण्याची प्रथा त्यांनी सुरवात केली, अंदाजे १९२३. शास्त्रीय संगीताशिवाय त्या नाट्यसंगीत गात असत व नाटकांत काम सुद्धा करत. त्यांनी हिंदुस्थान फिरून किराणा गायकी २० व्या शतकात यशस्वीपणे पसरवली. त्यांनी अनेक शिष्या तयार केल्या, त्यांत  माणिक वर्मा व प्रभा अत्रे यांची नावे घ्यावी लागतील.

**- पं. सुजन राणे**

(चित्र व माहिती)